# मराठी विभाग अहवाल
## शैक्षणिक वर्ष २०१७ – २०१८

महाविद्यालयात मराठी विषयाचे अध्यापन पदवी व पदव्युत्तर पातळीवर केले जाते. या शैक्षणिक वर्षात मराठी विभागात पदवीसाठी द्वितीय व तृतीय वर्षाचे मिळून १२० विद्यार्थ्यांनी तर पदव्युत्तर वर्गाला १५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. मा. प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली वार्षिक नियोजन करण्यात आले. अभ्यासक्रम पूर्ततेचा वेळोवेळी आढावा घेण्यात आला. परीक्षेची पूर्वतयारी म्हणून विद्यार्थ्यांकडून सातत्याने गृहपाठ लिहून घेण्यात आले. विद्यार्थ्यांची सराव परीक्षा घेण्यात आली. चर्चासत्र, सेमीनारचे आयोजन करण्यात आले. मागील शैक्षणिक वर्षात टी.वाय.बी.ए.ची कु. माधवी दौंडकर ही विद्यार्थिनी सुमारे ७८.३३ टक्के गुण मिळवून मराठी विभागात पहिली तर कला शाखेत दुसरी आली.

मराठी विभाग व मराठी वाङ्मय मंडळाच्या वतीने विद्यार्थ्यांच्या कला गुणांना प्रोत्साहन देताना त्यांच्यामध्ये मराठी भाषा व संस्कृती आणि विविध भाषिक कौशल्य विकसित व समृद्ध करण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्यातील काही ठळक उपक्रमांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

दि. ४ सप्टेंबर २०१७ रोजी द्वितीय वर्ष कला शाखेत मराठी विषयाचा विशेषस्तरावर अभ्यास करण्यासाठी प्रवेश घेतलेल्या सुमारे ७८ विद्यार्थ्यांचे स्वागत प्राचार्य डॉ.एस.बी.पाटील यांच्या शुभहस्ते गुलाबपुष्प देऊन करण्यात आले. दि. ७ सप्टेंबर रोजी पुण्याच्या सरस्वती विद्या मंदिर महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख डॉ. राजेंद्र थोरात यांचे 'प्रसारमाध्यमातील संधी' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. माणसाच्या जीवनाची सर्व क्षेत्रे प्रसारमाध्यमांनी व्यापली असून त्यासाठी लागणा–या तज्ज्ञ मनुष्यबळाची गरज लक्षात घेता विद्यार्थ्यांनी प्रसारमाध्यमांमधील संधींचा आपल्या करिअरसाठी विचार करावा असे आवाहन त्यांनी केले. मराठी विभागात शिकणा–या व नुकत्याच पुणे शहर पोलीस दलात निवड झालेल्या शितल दौंडकर व ज्ञानेश्वरी थिटे या विद्यार्थिनींचा सत्कार मा. प्राचार्य डॉ. एस.बी.पाटील यांच्या हस्ते करण्यात आला.

दि. १४ ऑक्टोबर रोजी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरी करताना वाचन संस्कृतीच्या प्रचार व प्रसारासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये 'मला भावलेले पुस्तक' या विषयावर निबंधस्पर्धा, काव्यवाचन स्पर्धा, हस्ताक्षर स्पर्धा, आवडत्या उता–याचे वाचन, साहित्यिक प्रश्नमंजूषा, ग्रंथपरिचय, विविध वर्तमानपत्रातील अग्रलेखांचे वाचन इ. उपक्रम राबविण्यात आले. ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कविवर्य विंदा करंदीकर यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून त्यांच्या निवडक कवितांचे वाचन विद्यार्थ्यांनी केले. मराठी विभागात विचाराकडून विवेकाकडे घेऊन जाणारा **डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम वाचन कट्टा** सुरू करण्यात आला. त्याचे उदघाटन प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांच्या हस्ते झाले. या सर्व उपक्रमांमध्ये कला व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यांना साधना साप्ताहिकाचा युवा दिवाळी अंक भेट देण्यात आला.

दि. १ जानेवारी २०१८ रोजी मराठी भाषा पंधरवडयाचे औचित्य साधून महाराष्ट्र साहित्य पत्रिका संपादन मंडळाचे सदस्य आणि तळेगाव ढमढेरे महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख डॉ. संदीप सांगळे यांचे 'मराठीतील संधी' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. पटकथालेखन, अनुवाद कौशल्य, प्रसारमाध्यमांतील संधी, सूत्रसंचालन व भाषा, मुद्रित शोधन, निवेदन, पत्रकारिता अशा अनेक क्षेत्रात करिअरच्या संधी निर्माण झाल्या असल्याचे त्यांनी सांगितले.

भूगोल व मराठी विभागाच्या वतीने एकत्रित शैक्षणिक सहलीचे आयोजन दि. १६ ते १९ जानेवारी दरम्यान करण्यात आले. कोल्हापूर परीसरातील पन्हाळा, ज्योतीबा तसेच रत्नागिरी, गणपतीपुळे, मालगुंड, गुहाघर,

परशुराम मंदिर, प्रतापगड, महाबळेश्वर आणि वाई आदि ठिकाणांना भेटी दिल्या. तसेच विद्यार्थ्यांनी महाबळेश्वर जवळील भिलार या देशातील पहिल्या पुस्तकांच्या गावाला भेट देऊन वाचनानंद अनुभवला आणि एखादे गाव इतके पुस्तक प्रेमाने भारलेले असू शकते याचा प्रत्याक्षानुभवही घेतला. भिलार येथे सरकारच्या पुढाकाराने वाचन चळवळ वाढावी, वाचनाची आवड सहज पूर्ण व्हावी, मराठीतील समृद्ध साहित्य परंपरेची माहिती व्हावी या उद्देशाने हा वाचन प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. कथा, कादंबरी, कविता, ललित, बालसाहित्य, संतसाहित्य, चरित्र, आत्मचरित्र, विज्ञान, इतिहास, प्रवासवर्णन अशा विविध साहित्य प्रकारातील सुमारे पंचवीस हजारांपेक्षा अधिकची पुस्तके या ठिकाणी उपलब्ध आहेत. ग्रामस्थांनी आपल्या राहत्या घराचा काही भाग वाचन संस्कृती समृद्ध करणा—या या उपक्रमासाठी दिला असून प्रत्येक साहित्यप्रकाराशी सुसंगत अशी अनुभवचित्रे व कलाकृतींनी घरांच्या भिंती सजल्या आहेत. जागोजागी मान्यवर साहित्यिकांच्या गाजलेल्या कवितांचे व साहित्यविषयक माहितीचे फलक तसेच भिंतीवर विविध पुस्तकांच्या मुखपृष्ठांची रंगरंगोटी करून संपूर्ण गावाची आकर्षक सजावट करण्यात आली आहे. याशिवाय मराठीतील नामवंत साहित्यिकांचा परिचय नेमक्या शब्दात करून देणा—या फलकांनी ग्रामदेवतेचे मंदिर सजले आहे. या वाचनप्रेरणा अभ्यास सहलीत दिवसभरात विद्यार्थ्यांनी गावातील अनेक घरांना भेटी देऊन या उपक्रमाची माहिती जाणून घेतली. या वेळी पुस्तकांचं गाव भिलार यावर आधारित चित्रफित विद्यार्थ्यांना दाखविण्यात आली. या प्रकल्पाचे सहायक बाळाजी हळवे यांनी विद्यार्थ्यांना संपूर्ण प्रकल्पाची माहिती दिली. शासनाचा पुढाकार आणि ग्रामस्थांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे भिलारमध्ये पुस्तकांच्या गावाच्या या अभिनव उपक्रमाची निर्मिती झाली असून विद्यार्थ्यांनी त्यापासून प्रेरणा घेऊन आपापल्या गावात असा उपक्रम सुरू करावा असे त्यांनी आवाहन केले. .

मराठी राजभाषा दिनाचे औचित्य साधून दि. २४ फेब्रुवारी रोजी कवी भरत दौंडकर यांचे माता, माती व संस्कृती या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. महाराष्ट्राला प्रबोधनाची मोठी परंपरा असुनही समाज संकुचित होत चालला आहे. स्वच्छ अभियानाच्या झाडूने माणसाच्या मनातील जातीपातीचा, अंधश्रध्देचा, दांभिकतेचा कचरा कसा झाडायचा हा प्रश्न गंभीर असून वाढते सामाजिक बहिरेपण समाजारोग्यासाठी घातक असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी 'गोफ, नोटबंदी, स्वप्नांचे खून, घुंगरू, तुरूंगात गेलेल्या बाबाची कहाणी, भटकी शाळा' अशा अनेक कविता त्यांनी सादर केल्या. विद्यार्थ्यांनीही या कवितांना उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या कार्यक्रमात मराठी विभागातील विद्यार्थ्यांनी आपापल्या गावातून संकलित केलेल्या लोकगीतांचा संग्रह असलेल्या **'लोकजागर'** या संपादित विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले.

दि. २७ फेब्रुवारी रोजी कवी कुसुमाग्रज यांची जयंती मराठी राजभाषादिन म्हणून साजरी केली. या वेळी प्राचार्य डॉ. एस.बी.पाटील म्हणाले की, मराठी भाषेची प्राचीनता, मौलिकता, श्रेष्ठ साहित्याची परंपरा, भौगोलिक विस्तार या सर्व अंगानी विचार करता मराठी ही अभिजात भाषा आहे. तिचे अभिजातपण स्वयंसिद्ध असल्याने मराठी भाषेला लवकरात लवकर अभिजात भाषेचा दर्जा मिळावा अशी मागणी केली. उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनी अभिजात मराठी भाषा समितीच्या अहवालाची माहिती दिली. अभिजात भाषेचे केंद्र सरकारचे निकष, मराठीचे वय अडीच हजार वर्षांपूर्वीचे असल्याचे पुरावे, मराठीतील शिलिलेख व ताम्रपट, विविध देशी भाषा, मराठी भाषा उत्पत्तीविषयी विचारवंतांची मते आणि गाथासप्तपदीपासून सुरू झालेला मराठी भाषेचा प्रवास याबद्दल विद्यार्थ्यांना माहिती दिली.

यावेळी मराठी विभागातील विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील ग्रंथालयाला भेट देऊन विश्वकोश, विविध वाङ्मयप्रकारातील पुस्तके, नियतकालिके याबद्दल माहिती जाणून घेतली. उपस्थित विद्यार्थी, प्राध्यापक व सेवकांनी मराठी साहित्याचे वाचन व मराठी संस्कृतीचा ठेवा जतन करण्याची शपथ घेतली.

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून मराठी विभागाच्या वतीने दि. १ जे ८ मार्च २०१८ दरम्यान जागर जाणिवा अभियानांतर्गत 'काळाच्या पुढे असणा—या महिला' या विषयावर परिसंवाद, 'उंच माझा झोका' या विषयावर मुक्त संवाद, स्त्रीवादी साहित्याची ओळख, तसेच 'मी मुलगी बोलतेय, स्त्रीभ्रूणहत्या एक सामाजिक कलंक, मुलगी शिकली प्रगती झाली, मला काय हवं या विषयांवर निबंध स्पर्धा आदि उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या सर्व उपक्रमात प्रथम वर्ष वाणिज्य शाखेतील २८० विद्यार्थिनी सहभागी झाल्या. कल्याणी दौंडकर, अश्विनी धाडगे, कीर्ती कोहिणकर, सोनाली भांबुरे, शीतल भुजबळ, अंकिता पोखरकर, प्रतीक्षा पाटोळे, मयुरी सैद, दिपाली ढमाले, निकिता बनकर, प्राजक्ता मांजरे, पूजा सांडभोर, ऋतुजा वाळुंज, या विविध स्पर्धा विजेत्या विद्यार्थिनींना साप्ताहिक साधनाचा महिला दिन विशेषांक देऊन गौरविण्यात आले.

या प्रसंगी उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनी आपली कुटुंबसंस्था स्त्रियांच्या त्याग व समर्पणावर उभी असून कुटुंब व्यवस्थापनाची संपूर्ण जबाबदारी स्त्रिया अत्यंत जबाबदारीने पार पाडत असतात. त्यामुळे जागतिक महिला दिन हा स्त्रीत्वाचा उत्सव म्हणून साजरा व्हायला हवा असे सांगितले. या प्रसंगी कोमल गायकवाड, अक्षदा वाघ, प्राजक्ता गदादे या विद्यार्थिनींनी आपली मनोगते व्यक्त केली. विद्यार्थिनींना देण्यात आलेल्या आत्मनिर्भरतेच्या शपथेचे वाचन प्रा. वर्षा कांबळे यांनी केले.

तृतीय वर्ष कला शाखेत मराठीचा विशेषस्तरावर अभ्यास करणा—या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ दि. १० मार्च २०१८ रोजी आयोजित करण्यात आला. या वेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी चाकणच्या कला, वाणिज्य महाविद्यालयातील प्रा. डॉ. दिलीप कसबे यांचे 'भाषाक्षेत्रातील संधी' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. विद्यार्थ्यांनी प्रतिभा, कल्पनाशक्ती, सर्जनशीलता या शक्तींच्या साह्याने भाषिक कौशल्य आत्मसात करून मराठी भाषेवर प्रभुत्व मिळविले तर भाषाक्षेत्रातही करिअरचे शिक्षकी पेशासह निवेदक, पत्रकारिता, अनुवादक, जाहिरातलेखक, मुद्रिकशोधक, पटकथा— संवादलेखक, व्याख्याता, कथाकथन, काव्यगायन असे अनेक पर्याय करिअर म्हणून उपलब्ध असल्याचे ते म्हणाले. तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी मराठी विभागास कवी कुसुमाग्रज यांची 'स्वातंत्र्यदेवतेची विनवणी' या कवितेची प्रतिमा भेट दिली.

मराठी विभागातील या सर्व उपक्रमांना प्राचार्य डॉ. एस.बी.पाटील, उपप्राचार्य डॉ. एच. एम. जरे, डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, प्रा. दिलीप मुळूक, प्रबंधक श्री. कैलास पाचारणे यांचे विशेष सहकार्य लाभले. माझे सहकारी मराठी वाङ्मय मंडळ प्रमुख डॉ. बी.डी.अनुसे, प्रा.व्ही.व्ही.कांबळे यांचीही या कार्यक्रमांच्या आयोजनात विशेष मदत झाली.

डॉ. संजय शिंदे

मराठी विभाग प्रमुख

हुतात्मा राजगुरु महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे.